अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम खर्चाकरिता व वसतीगृहाचे व्यवस्थापन करण्याकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः वसगृ -२०१५/प्र.क्र. ७०/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : ०२ फेब्रुवारी, २०१६.

<u>**वाचा -**</u>

१) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. मौआम-२००९/प्र.क्र.१५/का.८, दि.०२.०३.२०१०
२) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. वसगृ-२०११/प्र.क्र.१३०/का.८, दि.२०.१२.२०११
३) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. वसगृ-२०१२/प्र.क्र.१६८/का.८, दि.२१.०६.२०१३ दि.२८.०७.२०१५
४) समक्रमाकांचे शासन निर्णय : दि.२५/५/२०१५, दि.१०.०७.२०१५, दि.१०.०९.२०१५, दि.१६/१२/२०१५, दि.१७/१२/२०१५ व दि.२७/१/२०१६.
५) शासन परिपत्रक क्रमांकःवित्त विभाग क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.०४.२०१५
६) शासन परिपत्रक क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्र.बियुडी-२०१४/प्र.क्र.१४८(भाग-२)/का.७, दि.२१.०४.२०१५.

<u>**प्रस्तावना -**</u>

राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीसाठी वसतीगृहे बांधण्याबाबतचा शासन निर्णय समक्रमांक, दिनांक २ मार्च, २०१० रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये उपलब्ध असलेल्या जमिनीवर अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतीगृह बांधण्यासंदर्भातील कार्यपध्दती दि.२०.१२.२०११ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे.तसेच अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरिता बांधण्यात येत असलेल्या वसतीगृहांच्या व्यवस्थापनाबाबत कार्यपध्दती दिनांक २१.०६.२०१३ व दि.२८.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे. वित्त विभाग, शासन परिपत्रक, दि.१७/४/२०१५ अन्वये सन २०१५-१६ करिता ७० % तरतूद वितरीत करण्यास मान्यता असल्याने अर्थसंकल्पित तरतूद रु.४.९० कोटी इतकी असून आतापर्यत रु.३,९४,९०,०००/- (रुपये तीन कोटी चौऱ्याण्णव लाख नव्वद हजार फक्त) इतक्या निधीचे ७० % प्रमाणे वितरण करण्यात आले असून रु.९५,१०,०००/- (रुपये पंचाण्णव लाख १० हजार फक्त) इतका निधी शिल्लक आहे. शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथील वसतीगृहाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली, शासकीय तंत्रनिकेतन, औद्योगिक

प्रशिक्षण संस्था (वसमत), हिंगोली व शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद येथील वसतीगृहांच्या व्यवस्थापनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय –

शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर या ठिकाणी अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या वसतीगृहाच्या बांधकामासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर रू. ४८,१६,०००/- (रुपये अठ्ठेचाळीस लाख सोळा हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास याव्दारे मान्यता देत आहे.

२. जिल्हाधिकारी चंद्रपूर, कोल्हापूर, हिंगोली व औरंगाबाद यांना व्यवस्थापनाकरिता खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

अ.क्र.	वसतीगृहाचे ठिकाण	शासन निर्णय दि.२५/५/२०१५ अन्वये मानधनाकरिता वितरित निधी	आता वितरीत करावयाची तरतूद रूपये	शेरा
१	औद्योगिक प्रशिक्षण संस्था,चंद्रपूर	६,२०,०००/-	८,१०,०००/-	सदर वसतीगृह ३० मुलींचे आहे. सबब विद्युत, पाणी व कार्यालयीन खर्चाकरिता रू.३.०० लाख प्रमाणे परिगणना.यापूर्वी दिलेल्या निधीच्या उपयोगिता प्रमाणपत्राच्या अधीन.
२	राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर	६,२०,०००/-	११,१०,०००/-	अद्याप उपयोगिता प्रमाणपत्र व मागणीपत्र प्राप्त झालेले नाही तथापि उपयोगिता प्रमाणपत्राच्या अधिन राहून निधी येत आहे.
३	शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली	---	१२,८९,०००/-	मागणीपत्र प्राप्त झालेले आहे. जुलै, २०१५ पासून प्रवेश प्रक्रिया सुरु झाले असल्याने ९ महिन्याकरिता निधी वितरण MsDP अंतर्गत दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्राच्या अधिन राहून निधी देण्यात येत आहे.
४	बसमत, हिंगोली	----	७,२०,०००/-	वसतीगृहाचा ताबा दि.०६.०८.२०१५ रोजी प्राप्त. त्यामुळे ८ महिन्यासाठी निधी प्रस्तावित. MsDP अंतर्गत दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्राच्या अधिन राहून निधी देण्यात येत आहे.
५	शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद	----	७,६५,०००/-	वसतीगृहाचा ताबा माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये प्राप्त झाला आहे. त्यामुळे ६ महिन्यासाठी निधी वितरण. MsDP अंतर्गत दिलेल्या निधीचे उपयोगिता उपयोगिता प्रमाणपत्राच्या अधिन राहून निधी देण्यात यावा.
एकूण			४६,९४,०००/-	

३. जिल्हाधिकारी सोलापूर यांना सन २०१५-१६ करिता वरीलप्रमाणे बांधकामासाठी रू.४८.१६ लक्ष इतका निधी व जिल्हाधिकारी चंद्रपूर, कोल्हापूर, हिंगोली व औरंगाबाद यांना वरीलप्रमाणे व्यवस्थापनासाठी रू.४६.९४ लक्ष इतका निधी अशी एकूण रु. ९५,१०,०००/- (रुपये पंचाण्णव लाख दहा हजार फक्त) इतकी रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून आहरण व संवितरण करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

४. सदर तरतूद जिल्हाधिकारी, सोलापूर, चंद्रपूर, कोल्हापूर, हिंगोली व औरंगाबाद यांचेकडे सूपुर्द करण्यात येत असून याकरीता संबंधित जिल्हाधिकारी "आहरण व संवितरण अधिकारी आणि त्यांनी प्राधिकृत केलेले दुय्यम अधिकारी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील.

५. सदर निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित जिल्हाधिकारी यांनी शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करावे तसेच अतिप्रदान व अखर्चित निधी परतावा शासनास भरणा (जमा)करण्याबाबत वित्त विभागाच्या दिनांक ०४ मार्च २०१५ रोजीच्या परिपत्रकातील सूचनानुसार संबधित जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी.तसेच यापूर्वीचे उपयोगिता प्रमाणपत्र व महालेखापाल यांच्याशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय पुढील निधी वितरीत करण्यात येऊ नये.

६. सदरचा खर्च करण्यास वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत C.V.C. च्या मार्गदर्शक तत्वानुसार / CAG च्या निदेशानुसार कोणताही शासन निर्णय/अटी व शर्तींचा भंग होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी घ्यावी. सदर रक्कम वितरीत करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे निरिक्षण अहवाल/वित्तीय कार्यपध्दती यांचा अवलंब करावा. तसेच सदर रक्कम चालू आर्थिक वर्षात उपयोगात आणणे आवश्यक राहील. सदर निधी कोणत्याही संस्थेत ठेव स्वरुपात जमा करता येणार नाही.

७. सदरचा खर्च मागणी क्रमांक झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०८) शहरातील अल्पसंख्यांक समाजातील वसतीगृहाकरिता सहायक अनुदान (२२३५ ए १४२), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक दि.१७.४.२०१५ यास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०२१७२६०११४१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ainul C Attar

Digitally signed by Ainul C Attar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ainul C Attar
Date: 2016.02.03 17:09:15 +05'30'

(अैनुल अत्तार)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर

२) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व परीक्षा), मुंबई/नागपूर
३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
५) जिल्हाधिकारी, सोलापूर, चंद्रपूर, कोल्हापूर, हिंगोली व औरंगाबाद
६) कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर
७) प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था,चंद्रपूर
८) प्राचार्य, राजाराम महाविद्यालय,कोल्हापूर
९) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली
१०) प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,वसमत, हिंगोली
११) प्राचार्य, शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद
१२) सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पाचवा मजला, मुंबई
१३) अवर सचिव, का.७, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की त्यांनी उक्त रकमा संबंधिताना कृपया B.D.S. वर तात्काळ उपलब्ध करुन देण्यात याव्यात.
१४) जिल्हा कोषागार अधिकारी सोलापूर, चंद्रपूर, कोल्हापूर हिंगोली,औरंगाबाद.
१५) वित्त विभाग (अर्थसंकल्प -१४, व्यय -४) मंत्रालय, मुंबई
१६) नियोजन विभाग (कार्या.१४७५)
१७) निवड नस्ती.